तरुण भारत

# शहाजी महाविद्यालय सुवर्णमहोत्सवी वर्ष सांगता

**कोल्हापूर :** शाहू छत्रपती शिक्षण संस्थेच्या शहाजी छत्रपती महाविद्यायाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाची सांगता शनिवार, २१ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. यशवंतराव चव्हाण सभागृहात होणाऱ्या सांगता समारंभासाठी श्रीमंत शाहू महाराज छत्रपती यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाला कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, आमदार पी. एन. पाटील–सडोलीकर, संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे, मानद सचिव विजय बोंद्रे उपस्थित राहणार आहेत. प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांनी केले आहे.

तरूण भारत

# अफगाणिस्तानमधील दीडशे विद्यार्थ्यांचे प्रवेश रखडणार ?

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत विविध अभ्यासक्रमांना दरवर्षी परदेशी विद्यार्थी प्रवेश घेत असतात. २०२१-२२ या शैक्षणिक वर्षासाठी ६५० परदेशी विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठात अर्ज केले होते. अर्जाच्या पडताळणीनंतर २६० विद्यार्थ्यांची विविध अभ्यासक्रमासाठी निवड करण्यात आली आहे. त्यापैकी १५० विद्यार्थी अफगाणिस्तानमधील आहेत. सध्या अफगाणिस्तानमध्ये उद्भवलेल्या परिस्थितीमुळे या विद्यार्थ्यांचे प्रवेश रखडण्याची किंवा रद्द होण्याची शक्यता आहे.

भारत सरकारच्या मार्गदर्शनाखाली इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशनच्यावतीने परदेशी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. शिवाजी विद्यापीठात २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात अफगाणिस्तानमधील १५० विद्यार्थ्यांपैकी किती विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणार याचा अहवाल अद्याप विद्यापीठाला प्राप्त झालेला नाही. इंटरनॅशनल अफेअर्स सेलअंतर्गत विद्यापीठात पर्यावरणशास्त्र, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, पदार्थ विज्ञानशास्त्र, बी. टेक., एम. टेक., लॉ., अशा अनेक विषयांच्या प्रवेशासाठी संबंधित विद्यार्थ्यांचे अर्ज आहेत. इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशनच्यावतीने देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीमध्ये विद्यार्थ्यांचा शैक्षणिक, राहण्याचा, जेवण आणि प्रवासाचा खर्च असतो. मात्र सध्या अफगाणिस्तानमधील अराजकतेमुळे तेथील विद्यार्थी शिक्षणासाठी भारतात येतील की नाही, यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे शिक्षणतज्ज्ञांचे मत आहे.



### भारत सरकारच्या सूचनेचे पालन करणार

शिवाजी विद्यापीठात अफगाणिस्तानमधील १५० विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत. परंतु शिवाजी विद्यापीठ भारत सरकारने दिलेल्या सूचनांचे पालन करणार आहे. सध्या पर्यावरणशास्त्र विभागात शेवटच्या सेमिस्टरला असलेल्या अमानुल्ला आदिल याला सर्व प्रकारची मदत विद्यापीठ करणार आहे. भविष्यात भारत सरकारने अफगाणिस्तानमधील सरकारबरोबर चर्चा करून भारतात येऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली तर शिवाजी विद्यापीठ त्यांचे स्वागतच करेल.

– डॉ. पी. एस. पाटील (प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ)

माझी शेवटच्या सेमिस्टरची परीक्षा सुरू आहे. सध्या अफगाणिस्तानमधील परिस्थिती पाहून मला कुटुंबाची काळजी वाटते. शिक्षण संपल्यानंतर भारत सरकार माझ्याबद्दल काय निर्णय घेईल, त्यावरच आयुष्याचा पुढील प्रवास अवलंबून असेल, असे अमानुल्ला आदिल या विद्यार्थ्याने आपल्या भावना बोलून दाखवल्या.

तरुण भारत

# शाळा, महाविद्यालयांचा निर्णय पाच दिवसात

प्रतिनिधी
पुणे

राज्यातील शाळा आणि महाविद्यालये सुरू करण्यासंदर्भात येत्या ५ ते ६ दिवसात निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी गुरुवारी येथे दिली.

पुणे दौऱ्यावर आले असता ते पत्रकारांशी बोलत होते.



मंत्री टोपे म्हणाले, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांच्याशी शाळा व महाविद्यालये सुरू करण्याबाबत चर्चा झाली आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभाग कुलगुरुंच्या संपर्कात आहे. कुलगुरू त्यांच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालये सुरू करण्यासंदर्भातील अहवाल शिक्षण संचालक कार्यालयाकडे पाठवतील. येत्या पाच ते सहा दिवसात निर्णय होईल. शालेय शिक्षण विभाग आणि टास्क फोर्स यांची चर्चा होऊन शाळा सुरू करण्यासंदर्भातील निर्णय घेतला जाईल. सात जिल्ह्यांमध्ये कोरोना संख्या वाढली असली तरी काळजी करण्यासारखी परिस्थिती नसल्याचे ते म्हणाले.